# शरद जोशी फेलोशिप उपक्रम

## उद्देश

शरद जोशी यांनी शेती, शेतकऱ्यांचे आर्थिक स्वातंत्र्य, बाजारपेठेचे स्वातंत्र्य, महिला शेतकऱ्यांचा निर्णयप्रक्रियेतील सहभाग, ग्रामीण विकास आणि मुक्त अर्थव्यवस्था यांविषयी मांडलेल्या विचारांचा नव्याने अभ्यास करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे. हे विचार केवळ इतिहास म्हणून जतन करणे नव्हे, तर आजच्या शेतीसमोरील प्रश्न आणि नव्या संधी यांच्या संदर्भात त्यांचा अर्थ समजून घेणे, तपासणे आणि नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे. शरद जोशी यांची सर्वच मांडणी ही जागतिक धोरणे, आर्थिक-स्वातंत्र्य, शेती- उद्योग- उद्योजकता, शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन व्यवसायासाठी सक्षम होणे, शेतकरी महीलांचा शेतीतील सहभाग निर्णय प्रक्रियेपर्यंत आणणे, निर्णय स्वातंत्र्य या भोवती होती. शरद जोशी यांच्या विस्मरणात गेलेल्या अनेक पैलूंना पुन्हा एकदा समाजासमोर आणणे, जाणून घेणे, परत परत त्याचे चिंतन करावे व त्याचा वापर कृषी क्षेत्रातील सर्व घटकांनी आज कसा करता येईल, यासाठी हा उपक्रम असेल. या उपक्रमातून संशोधीत केलेल्या साहित्याचा उपयोग ग्रामीण भागातील युवक, शेतकरी, शेतीमधील विविध प्रश्नांचे अभ्यासक, कृषी इको- सिस्टीममध्ये काम करणारे सर्व घटक( शेतकरी, शासन, कृषी उद्योग, शिक्षण संस्था, माध्यमे, युवक, विद्यार्थी, संशोधक(आर्थिक-सामजिक-कृषी अर्थव्यवस्था इ.क्षेत्रातील)इ.सर्वच घटकांच्या दृष्टीने महत्वाचा असणार आहे. संशोधन, लेखन, संवाद, मुलाखती, चित्रफिती आणि सार्वजनिक सादरीकरण यांच्या माध्यमातून पुढील पिढीसाठी विश्वासार्ह व उपयुक्त साहित्य निर्माण करणे हाच या फेलोशिपचा व्यापक उद्देश आहे.

**महत्त्वाची सूचना:** निवड करताना केवळ शिक्षण, पद, अनुभवाची वर्षे किंवा परिचय पाहिला जाणार नाही. शरद जोशी यांच्या विचारांकडे स्वतंत्रपणे आणि मोकळेपणाने पाहण्याची तयारी, प्रश्न समजून घेण्याची क्षमता, वाचन व लेखनाची सवय, प्रस्तावित काम प्रत्यक्षात पूर्ण होण्याची शक्यता आणि ७–८ महिने सातत्याने काम करण्याची तयारी यांना अधिक महत्त्व दिले जाईल.

## अर्ज कोण करू शकतो?

- कुठल्याही शाखेतील पदवीधर
- वयोमर्यादा : २५ ते ५० वर्षे

## फेलोशिपचा कालावधी, आर्थिक सहाय्य व कामाची व्याप्ती

- फेलोशिपचा कालावधी साधारण ७–८ महिने असेल.
- निवडलेल्या फेलोला अभ्यास/संशोधनासाठी ₹१,००,००० (अक्षरी.रू एक लाख) आणि प्रत्यक्ष प्रवास झाल्यास कमाल ₹२५,००० प्रवासखर्च देण्यात येईल.(फेलोशीपची रक्कम विविध टप्प्यात कामाच्या प्रगतिनुसार वितरीत होईल. फेलोशिप व प्रवास खर्चाचे निकष निवड झालेल्या उमेदवारांना कळविण्यात येतील)
- लेखी काम साधारण २५,०००–३०,००० शब्दांचे असावे. व्हिडिओ किंवा इतर दृकश्राव्य प्रकल्प असल्यास नेमके किती भाग, किती वेळ आणि त्यातून काय तयार होणार हे स्पष्ट असावे.

- अपूर्ण, केवळ सर्वसाधारण माहिती देणारा, संदर्भ नसलेला किंवा इतरांकडून तयार करून घेतलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- आवश्यक पुरावे व नमुना लेखन अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

**अर्ज करण्याची अंतिम तारीख- २५ ऑक्टोबर २०२६**

**अर्ज पाठविण्याचा ई-मेल** sharadjoshi.fellowship@sahyadrifarms.com

### अ. पात्रतेची प्राथमिक तपासणी

खालील सर्व बाबींना स्पष्ट उत्तर द्या. "नाही" असल्यास कारण नमूद करा.

| पात्रता निकष | उत्तर |
|---|---|
| मी फेलोशिपसाठी सलग ७–८ महिने दर आठवड्याला किमान _____ तास देऊ शकतो/शकते. | ☐ होय ☐ नाही |
| मी आवश्यक वाचन, क्षेत्रभेटी, मुलाखती, लेखन/दृकश्राव्य निर्मिती आणि सुधारणा पूर्ण करण्यास तयार आहे. | ☐ होय ☐ नाही |
| मी मराठीत स्पष्टपणे लेखन/संवाद करू शकतो/शकते. आवश्यकतेनुसार हिंदी/इंग्रजी स्रोत वापरू शकतो/शकते. | ☐ होय ☐ नाही |
| मी नियोजित मार्गदर्शन बैठका आणि प्रगती आढाव्यांना उपस्थित राहू शकतो/शकते. | ☐ होय ☐ नाही |
| माझ्याकडे या कालावधीत प्रस्तावित काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक वेळ आणि मूलभूत साधने उपलब्ध आहेत. | ☐ होय ☐ नाही |

**"नाही" असलेल्या कोणत्याही उत्तराचे स्पष्टीकरण :**

________________________________________

### १. अर्जदाराची माहिती

पूर्ण नाव (प्रमाणपत्रानुसार): ____________________________________________

जन्मतारीख व वय: ____________________________________________

संपूर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता: ____________________________________________

मोबाईल क्रमांक: ______________________________________________________________

सध्याचे गाव/शहर व जिल्हा:
_______________________________________________________

सध्याचा व्यवसाय/पद व संस्थेचे नाव: ________________________________________________

शैक्षणिक पात्रता (शाखा, संस्था, वर्ष): ________________________________________________

भाषाज्ञान — वाचन / लेखन / संभाषण: _______________________________________________

ऑनलाइन परिचय (Online Profile) / वेबसाइट / प्रकाशित कामांची लिंक
(असल्यास):_____________

**सध्याची स्थिती (योग्य पर्यायावर खूण करा)**

☐ विद्यार्थी / संशोधक

☐ शेतकरी

☐ शेतकरी उत्पादक कंपनी किंवा सहकारी संस्थेशी संबंधित

☐ पत्रकार / लेखक / माध्यम क्षेत्रात कार्यरत

☐ शिक्षक / प्राध्यापक / शिक्षण क्षेत्रातील संशोधक

☐ कृषी उद्योग / सामाजिक संस्था / शासन / ग्रामीण विकास क्षेत्रात कार्यरत

☐ स्वतंत्र अभ्यासक

☐ इतर: ________________________

## २. तुमची पार्श्वभूमी आणि अनुभव

**२.१. शिक्षण, संशोधन, शेती, पत्रकारिता, माध्यमे, ग्रामीण विकास, सामाजिक-आर्थिक विषय किंवा कृषी इको-सिस्टीममधील किंवा इतर क्षेत्रातील तुमचा संबंधित अनुभव थोडक्यात सांगा.**
कमाल १०० शब्द; भूमिका, कालावधी आणि नेमके योगदान नमूद करा. (शीर्षकासह स्वतंत्र माहितीपत्र जोडावे)

**२.२. तुमची जास्तीत जास्त तीन महत्त्वाची कामे, लेख, अभ्यास, चित्रफिती किंवा प्रकल्प नमूद करा.**
प्रत्येकासाठी शीर्षक, वर्ष, त्यातील तुमची नेमकी भूमिका आणि प्रकाशित लिंक किंवा सोबत जोडावे.
(जोडले आहे, असे इथे नमुद करावे)

### २.३. या फेलोशिपच्या संदर्भात तुम्ही स्वतःकडे कसे पाहता?

- मी शेती किंवा ग्रामीण जीवनाशी प्रत्यक्ष जोडलेला/जोडलेली आहे आणि प्रश्न जवळून अनुभवले आहेत. ☐ होय ☐ नाही

- मी अभ्यास, संशोधन, लेखन किंवा माध्यमांच्या माध्यमातून शेतीच्या प्रश्नांचा मागोवा घेतला आहे.

  ☐ होय ☐ नाही
- मी या विषयात तुलनेने नवीन आहे; परंतु सखोल अभ्यास करून अर्थपूर्ण काम करण्याची तयारी आहे. ☐ होय ☐ नाही

## ३. शरद जोशी यांच्या विचारांशी तुमचा परिचय

### ३.१. शरद जोशी यांच्या कोणत्या विचाराशी तुम्ही सहमत किंवा असहमत आहात? त्यामागची कारणे मोकळेपणाने लिहा.

कमाल १५० शब्द. येथे कोणतेही ठरावीक "बरोबर उत्तर" अपेक्षित नाही. मुद्दा समजून घेऊन स्वतंत्रपणे विचार करण्याची तुमची पद्धत जाणून घेणे हा प्रश्नाचा उद्देश आहे. 'असहमत' म्हणजे फेलोशीप निवडीस अपात्र किंवा निगेटीव्ह मार्कींग नाही, याबाबत खात्री बाळगावी. (शीर्षकासह स्वतंत्र माहितीपत्र जोडावे)

### ३.२ शरद जोशी मला फारसे किंवा अजिबात माहीत नाही?

फारसे माहीत नाही ☐ अजिबात माहीत नाही ☐

## ४. फेलोशिपसाठी सुचवलेला विषय आणि कामाचा आराखडा

निवड करताना या विभागाला विशेष महत्त्व दिले जाईल. उत्तर शक्य तितके नेमके आणि प्रत्यक्ष कामाशी जोडलेले असावे.

उदा.

1. शरद जोशी यांच्या एखाद्या पुस्तकावर संशोधन – उदा. अर्थ सांगतो तो पुन्हा...
2. शरद जोशी यांचे 'बाजारपेठेचे स्वातंत्र्य' (म्हणजे काय)
3. शरद जोशींचे महीला धोरण
4. आम्ही शरद जोशींबरोबर का गेलो (मुलाखतींची व्हिडीओ सिरीज- ३-५ भाग)
5. शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य कशात दडले आहे (शरद जोशी यांच्या नजरेतून)
6. आजच्या काळातील युवा शेतकऱ्यांनी शरद जोशींच्या विचारधारेमधील काय अंगिकारावे: एकीकडे अस्मानी-सुलतानी संकटेही आहेत आणि दुसरीकडे संधींचे खुले अवकाश

7. शेतीव्यतिरिक्तचे : शरद जोशी
8. शरद जोशींची मुक्त अर्थव्यवस्था म्हणजे नेमके काय
9. शरद जोशींचे सत्याचे प्रयोग (कृतीचे प्रयोग उदा. आंबेठाणची शेती, सोया प्रकल्प, भामा प्रकल्प इ.)

(हे उदा. म्हणून दिलेले विषय आहेत. यापैकीच विषय निवडावा असे काही नाही)

**४.१ प्रस्तावित विषयाचे नेमके शीर्षक.**

**४.२. हा विषय तुम्ही का निवडला? आजच्या काळात त्याचा अभ्यास होणे का आवश्यक आहे?**
कमाल १५० शब्द. हा विषय शरद जोशी यांच्या विचारांशी कसा जोडला आहे आणि आजच्या कृषीक्षेत्रासाठी त्याचा उपयोग काय असू शकतो ते स्पष्ट करा. (शीर्षकासह स्वतंत्र माहितीपत्र जोडावे)

**४.३. माहिती मिळवण्यासाठी आणि तिची खात्री करण्यासाठी तुम्ही कोणते मार्ग वापरणार?**
उदा. पुस्तके व लेखांचे वाचन, जुनी कागदपत्रे (Archive), क्षेत्रभेटी, सखोल मुलाखती, व्यक्तींच्या आठवणींची नोंद (Oral History), एखाद्या प्रयोगाचा सविस्तर अभ्यास (Case Study), तुलना किंवा आकडेवारीचा अभ्यास (Data Analysis). प्रत्येक मार्ग का वापरणार हे थोडक्यात सांगा. कमाल ७५ शब्दात. (शीर्षकासह स्वतंत्र माहितीपत्र जोडावे)

**४.४. सुरुवातीला वाचणार किंवा पाहणार असलेल्या किमान आठ संदर्भांची यादी द्या.**
पुस्तक, लेख, भाषण, जुनी कागदपत्रे, चित्रफीत किंवा संकेतस्थळ—लेखक, शीर्षक, प्रकाशक/माध्यम, वर्ष आणि लिंक (असल्यास) द्या. यापैकी किमान तीन संदर्भ शरद जोशी यांच्या मूळ लेखन किंवा भाषणातील असावेत.

**५. फेलोशिपमधून नेमके काय तयार करणार?**

☐ सविस्तर लेखी अभ्यास (२५,०००–३०,००० शब्द)

☐ एका ठरावीक विषयाभोवती व्हिडिओ मुलाखतींची मालिका (Video Interview Series)

☐ ध्वनिमालिका (Podcast) / डिजिटल कथन (Digital Storytelling) / नवमाध्यमातील प्रयोग

☐ मिश्र स्वरूप (तपशील द्या)

☐ इतर (तपशील द्या)

**५.१. या फेलोशिपसाठी अर्ज करण्यामागची तुमची खरी प्रेरणा व उदीष्ट्य काय आहे?**
कमाल १५० शब्द. सर्वसाधारण गौरवपर मजकूर टाळा (म्हणजे शरज जोशी यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवायचे आहे वगैरे). हे काम तुमच्यासाठी वैयक्तिकदृष्ट्या का महत्त्वाचे आहे आणि फेलोशिपमुळे तुम्हाला असे काय करता येईल जे एकट्याने करणे कठीण आहे, हे सांगा. (शीर्षकासह स्वतंत्र माहितीपत्र जोडावे)

### ६. स्वतंत्र विचार आणि लेखनाची अनिवार्य चाचणी

**खालीलपैकी एका विषयावर ७००–७५० शब्दांचा स्वतंत्र मराठी लेख अर्जासोबत जोडा:**

- "शेतकऱ्याचे आर्थिक स्वातंत्र्य: आजच्या संदर्भात अर्थ आणि अडथळे"
- "बाजारपेठेचे स्वातंत्र्य आणि शेतकरी: संधी, जोखीम व आवश्यक संस्था"
- "शरद जोशी: आंदोलनाच्या प्रतिमेपलीकडील अर्थविचार"

**लेखन नमुन्यासाठी अट:** लेखात तुमचा स्वतःचा विचार दिसला पाहिजे. किमान तीन संदर्भ, शेवटी संदर्भांची यादी आणि एकूण शब्दसंख्या द्यावी. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) किंवा इतर डिजिटल साधने वापरली असल्यास ती नेमकी कशासाठी वापरली हे स्वतंत्रपणे लिहावे. लेखातील तथ्ये, संदर्भ आणि अंतिम मांडणीची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील.

### ७. सत्यता, प्रामाणिकपणा आणि माहितीच्या योग्य वापराविषयी हमी

- या अर्जातील माहिती सत्य व माझ्या माहितीनुसार अचूक आहे.
- प्रस्ताव आणि लेखन नमुना माझे स्वतःचे काम आहे; वापरलेल्या सर्व स्रोतांचे योग्य संदर्भ दिले आहेत.
- AI/डिजिटल साधने वापरली असल्यास त्यांचा वापर पारदर्शकपणे जाहीर केला आहे आणि सर्व तथ्यांची स्वतंत्र पडताळणी केली आहे.
- मार्गदर्शक समितीच्या नियोजित आढाव्यांमध्ये सहभागी होऊन आवश्यक सुधारणा करण्यास तयार आहे.
- निर्धारित वेळेत अंतिम काम पूर्ण न केल्यास किंवा साहित्यचौर्य/चुकीची माहिती आढळल्यास आयोजकांना  योग्य निर्णय घेण्याचा अधिकार असेल, हे मला मान्य आहे
- अंतिम प्रकाशन, संग्रहण, संकेतस्थळावरील उपलब्धता आणि वापराच्या अटी याचा सर्व अधिकार आयोजकांचा असेल, हे मला मान्य आहे.
- निवड झाल्यानंतर संमती पत्रावर सही केल्यानंतरच आपली निवड निश्चित होईल

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) किंवा इतर डिजिटल साधने वापरली असल्यास—कोणते साधन, कशासाठी आणि किती प्रमाणात वापरले याचा तपशील**

| | |
|---|---|
| **अर्जदाराची सही:** | **ठिकाण:** |
| **पूर्ण नाव:** | **दिनांक:** |

**अर्जासोबत काय जोडले आहे?**

☐ पूर्ण भरलेला व स्वाक्षरी केलेला अर्ज
☐ संक्षिप्त परिचय (कमाल १ पान, सुरवातीची क्र.१ मधील अर्जदाराची माहिती इथे परत देऊ नये)
☐ १०० शब्दांचे  लेखन (क्र.२.१ नुसार)
☐ यापूर्वी केलेल्या जास्तीत जास्त तीन कामांचे नमुने किंवा लिंक (२.२ नुसार)
☐ ३०० शब्दांचे लेखन (क्र.३.१ नुसार)
☐ १५० शब्दांचे लेखन (क्र.४.२ नुसार)
☐ ७५ शब्दांचे लेखन (क्र.४.३ नुसार)
☐ ७५ शब्दांचे लेखन (क्र.५.१ नुसार)
☐ ५० शब्दांचे लेखन (क्र.५.२ नुसार)
☐ ७००–७५० शब्दांचा अनिवार्य मराठी लेखन ( क्र.६ नुसार)

**निवड पद्धत कशी असेल?**

**अर्जाची प्राथमिक पडताळणी**
अपूर्ण किंवा पुरेशी माहिती नसलेले अर्ज बाद होतील.

↓

**लेखन व विचार कौशल्यांची तपासणी व गुणांकन**

↓

**मुलाखत क्र. १ व गुणांकन**

↓

**अंतिम मुलाखतीस पात्र**
लेखन कौशल्य गुणांकन + मुलाखत क्र. १ गुणांकन यांच्या आधारे निवडक उमेदवार अंतिम मुलाखतीस पात्र ठरतील.

↓

**अंतिम मुलाखत**
परीक्षक मंडळ योग्य उमेदवारांची अंतिम निवड करेल.

**अधिक माहिती साठी संपर्क:** ७०६६०२०४०८